www.rajdand.com
सातारा गुरूवार
२२.२.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्काराचे गुरुवारी वितरण

मुंबई : महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार, येत्या गुरूवारी, दि. २२ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. तर मानाचा ''गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार'' ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

वरळी येथील डोम, एनएससीआय (नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया) येथे गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या ५७ व्या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हे पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात करण्यात येतील.

जरांगेंकडून आंदोलनाची घोषणा

आता गावागावांत होणार 'रास्ता रोको', ज्येष्ठांनाही केले उपोषणाचे आवाहन

वडीगोद्री : मराठा समाजाला 'ओबीसी'मधून टिकणारे आरक्षण मिळावे, 'सग्यासोयऱ्यां'बाबतच्या अध्यादेशाची अंमलबजाणी व्हावी, या मागणीवर ठाम असलेल्या मनोज जरांगे-पाटील यांनी बुधवारी घेतलेल्या राज्यभरातील समाजबांधवांच्या बैठकीत आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्धार केला.

येत्या २४ फेब्रुवारीपासून तीन मार्चपर्यंत रोज गावागावांत सकाळी किंवा दुपारी 'रास्ता रोको', तीन मार्चला राज्यातील प्रत्येक जिल्हास्तरावर रास्ता रोको आंदोलनाची हाक त्यांनी दिली. आंदोलनाची पुढील दिशा ठरविताना त्यांनी नऊ मुद्दे मांडले. आता ज्येष्ठांनीही आपापल्या गावांत उपोषण सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना त्यांनी ज्येष्ठांच्या या आंदोलनात कोणाचे काही बरे-वाईट झाल्यास ती शासनाची जबाबदारी असेल, असा इशारा त्यांनी दिला.

विधिमंडळाच्या मंगळवारी (ता. २०) झालेल्या विशेष अधिवेशनात शासनाने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक एकमताने संमत केले. त्यानंतर लगेचच प्रतिक्रिया देताना जरांगे यांनी, 'मागणी एक, दिले दुसरेच' असे मत व्यक्त करून त्यावर समाज समाधानी नसल्याचे स्पष्ट केले होते.

ओबीसीमधून टिकणारे आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र देताना सगेसोयऱ्यांबाबत अध्यादेशाच्या मसुद्याची अंमलबजावणी करावी, ही मूळ मागणी असून त्यावर आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यावर त्यांनी आज बैठक घेण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार अंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे आज दुपारी झालेल्या बैठकीला राज्यभरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुलालाचा अवमान होऊ नये

जरांगे म्हणाले, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर समाजाचा विश्वास आहे. अध्यादेशाचा मसुदा देताना उधळलेल्या गुलालाचा त्यांनी अपमान होऊ देऊ नये. दोन दिवसांत सगेसोयऱ्यांबाबतच्या कायद्याची अंमलबजावणी करावी. तसे होत नसेल तर आरक्षण देण्याची शपथ अपूर्ण राहिल्याचे त्यांनी स्वतःहून जाहीर करावे. आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत. शिंदे समिती काय काम करते ते पाहावे.

नोंदी सापडलेल्या लोकांच्या नावांची यादी गावागावांत लावली नाही, त्यासाठी अभियान राबवले जात नाही. देवस्थान, भाट, हैद्राबाद गॅझेटधील नोंदी गृहीत धराव्यात. कुणबी व मराठा एक आहेत. मागण्यांची पूर्तता करावी.' दरम्यान, जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही जोरदार टीका केली. 'शासनाने दिलेले दहा टक्के आरक्षण आम्हाला नको आहे. ज्यांना हवे त्यांनी ते घ्यावे.

सापडलेल्या कुणबी नोंदींच्या आधारे सगेसोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र द्यावे, ओबीसीमधून टिकणारे आरक्षण द्यावे, ही मूळ मागणी आहे. त्यासाठीच हा लढा सुरू आहे. मागण्या मान्य होईपर्यंत अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरूच ठेवणार आहे', असेही जरांगेंनी सांगितले.

आमदार, खासदारांनी आमच्या दारासमोरून जायचे नाही, आम्हीही त्यांच्याकडे जाणार नाही. मराठा आरक्षण मिळेपर्यंत निवडणूक आयोगाने निवडणूक घेऊ नये. निवडणूक घेतल्यास गावात आल्यावर नेत्यांच्या गाड्या जमा करून घ्या, निवडणूक संपल्यावर परत करा गावागावांत वृद्धांसह सर्वांनी उपोषणाला बसण्याची तयारी ठेवावी उपोषणादरम्यान काही घडल्यास मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर जबाबदारी राजकारण्यांनी त्रास दिल्यास जशास तसे उत्तर देऊ. पोलिसांनी एखाद्यास ताब्यात घेतल्यास संबंधित गावातील सर्वजण पोलिस ठाण्यात जातील

राज्यातील सर्व पक्षांचे मराठा आमदार, खासदारांची एक मार्चला अंतरवाली सराटीत बैठक. सगेसोयऱ्यांबाबत अंमलबजावणी का केली नाही? याचा जाब समाज विचारणार

राज्यातील सर्व जिल्हा ठिकाणी तीन मार्चला एकाच वेळी दुपारी बाराला 'रास्ता रोको' आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजातील पदाधिकाऱ्यांनी (सभापती, सरपंच, ग्रा.पं. सदस्य, महापौर, नगरसेवक आदी) राजकीय कार्यक्रमांना जाऊ नये, गेल्यास संबंधितांना आयुष्यभर मदत करू नका, अशा सूचना देण्यात येतील.

बैठकीत ठरली आंदोलनाची दिशा

राज्यातील गावागावांत, शहरांत २४ फेब्रुवारी ते तीन मार्चपर्यंत एकाचवेळी रोज सकाळी साडेदहा ते दुपारी एक किंवा सकाळी न जमल्यास दुपारी चार ते सायंकाळी सात या वेळेत 'रास्ता रोको'. बारावी, दहावी परीक्षार्थींची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. प्रवासात अडचण आल्यास त्यांना मदत करावी, आंदोलनाबाबत पोलिसांना निवेदन द्यावे.

'एमआयडीसी'मार्फत वाढीव जमीन उपलब्ध करून देण्याचे निर्देश

बारामती - केंद्र शासनाच्या कामगार मंत्रालयाने बारामतीसाठी १०० खाटांचे रुग्णालय मंजूर केले आहे. भविष्यातील वाढत्या औद्योगिक वसाहतीची गरज लक्षात घेता येथे २०० खाटांच्या रुग्णालयाला मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एमआयडीसी) उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (ता. २१) दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त दालनात बारामती औद्योगिक वसाहत संघटनेच्या मागण्यांसंदर्भात बैठक झाली. बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, बारामती औद्योगिक वसाहत संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन शर्मा आदी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बारामती औद्योगिक क्षेत्र टप्पा २ येथे राज्य कामगार विमा रुग्णालयासाठी पाच एकर जागेची मागणी करण्यात आली होती. तथापि भविष्यातील आवश्यकता लक्षात घेऊन येथे २०० खाटांचे रुग्णालय होणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव तातडीने कर्मचारी राज्य विमा महामंडळामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. यासाठी निकषानुसार अधिक जागा आवश्यक असल्याने एमआयडीसीच्या माध्यमातून अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्यात यावी. बारामतीसह परिसरातून औद्योगिक व कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जातात. त्याअनुषंगाने येथे ड्रायपोर्ट निर्माण करण्याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. बारामती एमआयडीसीमधील अग्निशमन केंद्रात लवकरात लवकर आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात यावी.

तब्बल १२ वर्षानंतर राज्यातील शिक्षकेतर पदांची होणार संचमान्यता

मुंबई - राज्यातील सर्व अनुदानित, अंशतः अनुदानितच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तब्बल १२ वर्षानंतर संचमान्यता केली जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे राज्यातील सर्व प्रकारच्या अनुदानित शाळांमध्ये असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शेकडो रिक्त जागा आणि त्याचे वास्तव समोर येणार आहे. त्यामुळे या पदांचा आकृतीबंधही तयार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर या निर्णयाचे शिक्षक आमदारांसह शिक्षक संघटनांनी स्वागत केले आहे.

शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी शिक्षक आमदार रामनाथ मोते, शिक्षक आमदार नागो गाणार यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील अनुदानित शाळांमध्ये रिक्त असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमुळे शैक्षणिक गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामावर वेळोवेळी तत्कालिन सरकार आणि प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

तसेच शिक्षक परिषद आणि मागील काही वर्षांत महाराष्ट्र राज्य शिक्षक क्रांती संघटनेनेही यासाठीचे वास्तव सरकारपुढे मांडले होते. मात्र त्यानंतरही शिक्षण विभागाने कार्यवाही केली नव्हती. त्यामुळे अनेक संघटनांनी न्यायालयात धाव घेतली होती.

त्याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने यासंदर्भात आलेल्या अनेक रिट याचिका व त्यासंदर्भात अर्ज निकाली काढल्याने शिक्षण विभागाकडून आता अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संचमान्यता करण्यासाठीची कार्यवाही करण्याचे आदेश जारी केले आहेत.

दरम्यान, मागील सरकारच्या काळात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी शिपायांची पदेही रद्द करून ती खाजगी कंत्राटदारांच्या मार्फत भरण्याची भूमिका घेतली होती. त्याला शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्यासह अनेकांनी विरोध दर्शवला होता. मुलींच्या सुरक्षेसाठी कोणत्याही शाळांमध्ये कंत्राटी आणि बाह्य संस्थेकडून शिपाई भरला जावू नये अशी मागणी त्यांनी लावून धरली होती. मात्र आता न्यायालयाच्या आदेशानंतर आता राज्यातील सर्व अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर पदांची संचमान्यता होणार असल्याने यात शिपाई हे पदही पुन्हा यात सामील करून राज्यातील अनुदानित शाळांना सुरक्षित असे शिपाई हे पदे दिली जावीत अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस यांनी केली.

शरद पवार गटासह विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना उच्च न्यायालयाची नोटीस

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रतोद अनिल पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात तातडीची याचिका दाखल केली होती. शरद पवार गटाच्या दहा आमदारांना अपात्र घोषित करा, यासाठी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी रात्री उशिरा धाव घेतली होती. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी, न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठसमोर ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनवाणी झालीय. शरद पवार गट आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना न्यायालयानं नोटीस बजावली आहे.

न्यायालयानं बजावली नोटीस : मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी आज सुनावणी झाली. यात उच्च न्यायालयानं शरद पवार गटाला आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावलीय. तसंच १४ मार्चपर्यंत ही सुनावणी तहकूब करण्यात आलीय.

१४ मार्चपर्यंत सुनावणी तहकूब : विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार गटाचा असल्याचा निकाल दिला होता. त्यात अजित पवार आणि शरद पवार या दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र घोषित केलं होतं. त्या निर्णयाला प्रतोद अनिल पाटील यांनी वकील श्रीरंग वर्मा यांच्याद्वारे याचिकेतून आव्हान दिलं होतं. पाटील यांच्या याचिकेवर बुधवारी न्या. जी. एस. कुलकर्णी आणि न्या. फिरदोश पूनीवाला यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सुनावणी झाली. तसंच ही याचिका १४ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलीय.

दोन्ही गटातील आमदारांना केलं होतं पात्र : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचा आहे हे अध्यक्षांनी घोषित केलं होतं. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अजित पवार गटातील आमदारांना पात्र करत असताना शरद पवार गटातील आमदारांना देखील पात्र केलं. परंतु, शरद पवार गटातील आमदारांना अपात्र करायला हवं होतं. मात्र, दोन्ही गटातील आमदारांना पात्र घोषित करण्याच्या अध्यक्षांच्या निर्णयामुळं पक्षातील फूट हा पक्षांतर्गत मतभेद असल्याचा निष्कर्ष चुकीचा ठरला आहे. त्यामुळं आमदारांच्या अपात्रतेच्या याचिका फेटाळून लावण्याच्या निर्णयाला आव्हान दिल्याचं पाटील यांनी याचिकेत नमूद केलं होतं.

दोन्ही गटामध्ये पडली फूट : शरद पवारांनी १९९९ मध्ये या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या इतर राज्यांमध्ये देखील या पक्षाचे काही आमदार आणि खासदार आहेत. मात्र, गेल्या वर्षी जुलै महिन्यात अजित पवारांसह आठ आमदारांनी बंड केलं. सत्ताधारी भाजपा-शिवसेना सरकारमध्ये सामील झाले.

प्रॉपर्टीच्या वादातून नातवांनी स्वत:च्या वृध्द आजीला संपवले; सांगलीत थरकाप

सांगली : सांगली जिल्ह्यात संपत्तीच्या वादातून रक्ताच्या नात्याचा मुडदा पाडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संपत्तीच्या वादातून नातवांनी स्वत:च्या वृध्द आजीचा टॉवेलने गळा आवळून खून केल्याची घटना खानापूर तालुक्यातील पारेमध्ये घडली. सखुबाई संभाजी निकम (वय ८०) असे मृत झालेल्या दुर्दैवी आजीचे नाव आहे. पोलिसांनी आजीच्या एका अल्पवयीन नातवासह दुसरा नातू आशिष सतीश निकम, सून रेणुका सतीश निकम या तिघांना अटक केली आहे.

चिंचणी येथील सतीशशेठ निकम यांचा सोने-चांदी गलाई व्यवसाय आहे. त्यांची विटा, चिंचणी (मं.) यासह विविध ठिकाणी प्रॉपर्टी आहे. यातील अर्धा हिस्सा सतीश यांचे जावई कुणाल पाटील यांच्या नावावर करण्यासाठी त्यांची पारे येथील बहीण संगिता रामचंद्र साळुंखे यांनी भाऊ सतीश यांना सांगितले होते. त्याचा राग संशयित नातू आशिष, त्याचा अल्पवयीन भाऊ व सून रेणुका यांना होता.

आतीच्या घरी जाऊन आजीचा गळा दाबला

हा राग मनात धरून संशयित तिघांनी १९ फेब्रुवारी रोजी संगीता साळुंखे यांच्या पारे गावातील घरी जाऊन त्यांना तू तूझ्या भावाला बोलावून घेऊन ४८ तासांच्या आत सदरची प्रॉपर्टी फिरवून दे, नाहीतर तुला व म्हातारीला (सखुबाई) यांना ४८ तासानंतर दाखवितो, अशी धमकी देऊन हे तिघेही विट्याला निघून गेले. त्यानंतर मंगळवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास हे तिघेही सतीश यांची बहीण संगिता यांच्या पारे येथील घरी गेले. त्यावेळी सखुबाई या मुलगी संगिताच्या घरी होत्या. या तिघांनी पुन्हा त्याठिकाणी वाद घालण्यास सुरूवात केली.

त्यानंतर आजी सखुबाई यांना एका खोलीत नेऊन आतून दरवाजा बंद करून त्यांचा टॉवेलने गळा आवळून खून केला. त्यानंतर हे तिघेही संशयित त्यांच्या विटा येथील घरी आले. या घटनेची माहिती मिळताच उपअधीक्षक विपुल पाटील, पोलिस निरीक्षक शरद मेमाणे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पंचनामा करून सखुबाई यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी विटा ग्रामीण रूग्णालयात आणण्यात आला.

याप्रकरणी विटा पोलीसांनी मयत सखुबाई यांचा अल्पवयीन नातवासह दुसरा नातू आशिष, सून रेणुका निकम या तिघांना रात्री उशिरा अटक केली. या घटनेची विटा पोलीसांत नोंद झाली असून पोलीस निरीक्षक शरद मेमाणे पुढील तपास करीत आहेत.

३१ मार्चपर्यंत कांदा निर्यात बंदी कायम, नाशिकमधील शेतकऱ्यांमध्ये संताप

नाशिक : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी १८ फेब्रुवारीला अटी-शर्तीनुसार कांदा निर्यातीवरील बंदी उठवण्याची घोषणा केली होती. मात्र, त्यांनी केलेल्या घोषणेनंतर ४८ तासांच्या आत वाणिज्य विभागाचे सचिव रोहित कुमार सिंग यांनी अमित शाह यांच्या आदेशाला केराची टोपी दाखवली आहे. त्यामुळं कांदा निर्यात बंदी ३१ मार्चपर्यंत लागू राहणार आहे. या निर्णयामुळं कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये कमालाची नाराजी आहे.

कांद्या निर्यात बंदी हटवा : कांद्याचे बाजार भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयानं ७ डिसेंबरला कांदे निर्यात बंदी केली होती. ही निर्यात बंदी ३१ मार्चपर्यंत असल्याचं त्यावेळी अध्यदेशात म्हटलं होतं. मात्र, गुजरातमधील शेतकरी आणि वाहतूकदारांनी कांद्या निर्यात बंदी हटवावी, अशी जोरदार मागणी केली होती.

निर्याती बंदीचा निर्णय फिरवला : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत तीन लाख टन कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्यात आली होती. यासोबतच बांगलादेशला ५० हजार टन कांदा निर्यात करण्यासही मान्यता देण्यात आली. मात्र, दोन दिवसांतच कांदा निर्याती बंदीचा निर्णय फिरवण्यात आला आहे.

मंत्रीगटाच्या मान्यतेनंतर निर्यातीला मिळणार परवानगी- वाणिज्य विभागाचे सचिव रोहित कुमार सिंग यांनी स्पष्ट केले की, ''निर्यात बंदीचा निर्णय अजूनही कायम आहे. कांदा निर्यात बंदीची अंमलबजावणी सुरूच राहील. ग्राहकांना परवडणाऱ्या दरात कांदा उपलब्ध व्हावा, ही केंद्र सरकारची प्राथमिकता असल्याचंही त्यांनी नमूद केलेय. यासोबतच आंतरमंत्रालयीन गटाच्या मान्यतेनंतर मित्र देशांना कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केलेय.

कांद्याच्या भावात वाढ : लासलगाव बाजार समितीत १७ फेब्रुवारीला कांद्याला १ हजार २८० रुपये प्रतिक्विंटल भाव होता. मात्र, सरकारने १९ फेब्रुवारी रोजी निर्यात बंदी उठवल्यानंतर कांद्याचे भाव ४० टक्क्यांनी वाढून १ हजार ८०० रुपये प्रति क्विंटल झालाय. ३१ मार्चनंतर महाराष्ट्रात रब्बी हंगामात कांद्याच्या उत्पादनात घट होईल, असे मानले जात आहे.

पुढचे पाऊल

महाराष्ट्र विधिमंडळाने मराठा समाजाला नोकरी तसेच शिक्षणसंस्थांत दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय एकमताने घेऊन एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. खरे तर २०१४ च्या निवडणुकीपूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या काळात आणि पुढे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या राजवटीतही असेच निर्णय विधिमंडळाने घेतले होते.

तरीही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 'महायुती'च्या सरकारने घेतलेल्या निर्णयास 'ऐतिहासिक' हे विशेषण लावण्यास अनेक कारणे आहेत. पूर्वीच्या दोन सरकारांच्या काळात विधिमंडळाने घेतलेले निर्णय हे न्यायालयीन कसोटी पार करू शकले नव्हते. तेव्हा या सरकारला 'इम्पिरिकल डेटा' सादर करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते.

मात्र, यावेळी १५० दिवसांच्या अथक मेहनतीने हा 'डेटा' गोळा करण्यात आला आहे आणि त्यानंतर राज्य मागासवर्गीय आयोगाने 'हा समाज अनेक दशकांपासून पिढ्यान् पिढ्या मागास राहिला असल्यामुळे त्यास आरक्षण देण्यावाचून गत्यंतर नाही,' अशी शिफारस राज्य सरकारला केली.ती राज्य सरकारने स्वीकारली असून, त्यावर राज्य विधिमंडळाची एकमताची मोहोरही उमटली आहे. त्यामुळे या सरकारचे अभिनंदन करतानाच, विरोधकांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेचेही स्वागत करायला हवे.

अलीकडच्या काळात अशाप्रकारची सहमती दूर्मीळ झाली आहे. परंतु हे सगळे घडण्यासाठी फार मोठा आंदोलनाचा रेटा निर्माण व्हावा लागला, याची नोंद घ्यावीच लागेल. मनोज जरांगे यांना अनेकवेळा उपोषण करावे लागले आणि त्यांच्या मागे लाखोंचा जनसमुदाय आहे, हे पाहिल्यावर सरकार आणि प्रशासनाची यंत्रणा हलली. त्यामुळे राजकीय नेते, विशेषतः सत्ताधारी यांनी आनंदोत्सव साजरा करताना या सगळ्याचे भान ठेवले पाहिजे.

या सगळ्या समस्येची मुळे आर्थिक दुरवस्थेत आहेत आणि शेतीक्षेत्रात वेगवेगळ्या कारणांनी निर्माण झालेले अरिष्ट शेतीवर अवलंबून असलेल्या तरुणांत वैफल्य निर्माण करीत आहे. या दुखण्यावर सर्वसमावेशक उपचारांची गरज आहे. तरुणांच्या हातांना काम मिळायचे तर खासगी उद्योगांची गुंतवणूक वाढायला हवी. सध्या राज्याचे वातावरण अशा गुंतवणुकीस पूरक आहे का, याचे आत्मपरीक्षण सर्वांनीच; विशेषतः राजकीय वर्गाने करायची गरज आहे.

जसजसा संधींचा पैस विस्तारत जाईल, तसतसे 'मायबाप सरकार'कडे धाव घेण्याचे प्रमाण कमी होईल. परंतु बऱ्याचदा राजकारण्यांना लोकांचे आपल्यावरील अवलंबित्व कमी होऊ नये, असे वाटत असते. राज्याचे दूरगामी विचार करता अशा संकुचित राजकीय स्वार्थापायी नुकसानच होते. प्राण पणास लावून राज्यव्यापी आंदोलन उभे करणारे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी दहा टक्के आरक्षणाच्या निर्णयाबद्दल असमाधान व्यक्त केले आहे.

त्यांची भूमिकाही नीट समजून घ्यावी लागेल. त्याचवेळी हेही नमूद केले पाहिजे, की त्यांनीदेखील सामंजस्याने तोडगा काढण्याच्या प्रयत्नांना साथ द्यायला हवी. कोणत्याही सरकारला एखाद्या समाजघटकाला काही विशिष्ट सवलती बहाल करताना, समाजातील इतर घटकांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागते. जरांगे-पाटील यांची मागणी मराठा समाजाला कुणबी म्हणजेच 'इतरमागास' प्रवर्गातूनच ('ओबीसीं') आरक्षण मिळावे, अशी आहे.

मात्र, ती मान्य झाली असती तर 'ओबीसीं'वर अन्याय होणार होता. ताट तर एकच आणि खाणारी तोंडे मात्र वाढणार, असा पेच निर्माण होऊ शकला असता. त्यावर मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करून सररकारने प्रश्न सोडवला आहे. मात्र या निर्णयास अजून अनेक अडथळे पार करावयाचे आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणास ५० टक्क्यांची मर्यादा घातलेली असून, आपल्या राज्यात आता असलेले ५२ टक्के आरक्षण लक्षात घेता, या नव्या निर्णयामुळे ते आता ६२ टक्क्यांवर जाऊन पोचणार आहे. त्याशिवाय, राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी दहा टक्के आरक्षण आहे. आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ही अगदी अपवादात्मक परिस्थितीतच ओलांडली जाऊ शकते.

हा विषय न्यायालयाच्या चावडीवर गेला तर हा निर्णय घेण्यास नेमकी कोणती अपवादात्मक परिस्थिती निर्माण झालेली आहे, हे साधार दाखवून देण्याची जबाबदारी सरकारवर आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची घालून दिलेली मर्यादा ओलांडण्याचा अधिकार विधिमंडळास आहे काय, हा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. 'सग्यासोयऱ्यां'ना आरक्षण देण्यासंबंधात जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपावेतो निवडणुकाच घेऊ नयेत, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर एकीकडे न्यायालयीन लढाईची तयारी करतानाच, सरकारला या मैदानी लढाईलाही तोंड द्यावे लागणार आहे. लोकसभा निवडणूक जवळ आली असताना, हे सरकार 'मराठा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय' घेतल्यावरही अशा रीतीने दुहेरी पेचात सापडले आहे. मराठा आरक्षणाच्या बाबतीत सरकारने एक पाऊल ठोसपणे टाकले असले तरी मोठी मजल मारणे बाकी आहे, याची जाणीव ठेवली तर बरे.

अंबुज चित्रपटाने प्रथमच मातंग समाजाचा इतिहास पडद्यावर

सातारा : महाराष्ट्रातील लढाऊ समाज म्हणून मातंग समाजाकडे पाहिले जाते. समाजकारण ,राजकारण, शैक्षणिक ,सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा व कलाक्षेत्रात आपल्या कलागुणांना संधी मिळाली की त्याचे सोनं करणारे अनेक मातंग समाजात हिरेरत्ने तयार झालेले आहेत. त्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी अंबुज हा मराठी चित्रपट पाहणे म्हणजे मातंग समाजाचा इतिहास पडद्यावर पाहणे असाच आहे.

निर्माते नरेंद्र गायकवाड व सह निर्माता नितीन माने यांच्या संकल्पनेतून हा अंबुज चित्रपट तयार करून प्रेक्षकांच्या न्यायालयात निकालासाठी सादर केलेला आहे. मातंग समाजाची अस्मिता म्हणजे वीर लहुजी साळवे, मुक्ताई साळवे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अशा असंख्य लोकांनी प्रबोधनात्मक काम केले आहे. त्या समाजातील इतिहास युवा पिढीला माहीत असावे यासाठी कलावंत रामचंद्र धुमाळ, आर एन गायकवाड, मारुती पुराणिक व असंख्य कलावंतांनी परिश्रम करून आपली कला सादर करताना जीव ओतून काम केलेला आहे. त्याची सर्व समाज नक्कीच कदर करेल. असा विश्वास निर्माते नरेंद्र गायकवाड यांनी व्यक्त केला .

सदर अंबुज चित्रपटाचे चित्रीकरण हे उघडेवाडी, बेंबळ जिल्हा सोलापूर व पुणे जिल्ह्यातील इंदापूर या ग्रामीण भागात ग्रामीण कलावंतांना घेऊन चित्रीकरण केलेले आहे. स्वच्छतेचा संदेश देणारे बहुजनांचे नेते संत गाडगेबाबा जयंती निमित्त दिनांक २३ फेब्रुवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रात हा ऐतिहासिक व रसिकांच्या पसंतीला उतरणारा हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. सातारा शहरातील सेवन स्टार या ठिकाणी हा चित्रपट नक्कीच पाहतील असा विश्वास आनंदा साठे, शेखर पाटोळे व दत्ता केंगारे यांनी व्यक्त केला आहे.

चित्रपटाची कथा छाया व पटकथा नारायण गायकवाड संगीत गांधी स्टुडिओ सातारा व सद दिग्दर्शक माऊली पुराने यांचे आहे .सर्वच बाजूने एक उत्कृष्ट कलाकृती म्हणून त्याचा अनेक मान्यवरांनी गौरव केलेला आहे. आपल्या मराठी चित्रपट सृष्टी मध्ये अनेक चित्रपटांनी इतिहास घडवला आहे मराठी चित्रपटांमध्ये ही लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतून अनेक चित्रपट निर्माण झालेले आहेत. पण प्रत्यक्षात अंबुज हा चित्रपट हा खऱ्या अर्थाने प्रबोधनात्मक चित्रपट असून प्रेक्षकांनी थेटर मध्ये येऊन या चित्रपटाचा आस्वाद घ्यावा. अशी विनंती जेष्ठ कलावंत अमर गायकवाड, सातारचे माजी उपनगराध्यक्ष व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक प्रकाश बडेकर, किशोर गालफाडे,मनोज घाडगे तसेच शाहीर फरांदे आदी मान्यवरांनी केली आहे .

मांग किंवा मातंग हा भारतातील एक अनुसुचित समाविष्ट असलेला समुह आहे. या जाती समुहाला मध्ययुगीन कालात बहिष्कृत (अस्प्रश्य) मानले गेले होते. या जातसमुहाची माणसे प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यात राहतात. २०११ मध्ये, महाराष्ट्रात मातंगांची लोकसंख्या सुमारे २५ लाख आहे. आज ती ४०लाख आसपास आहे.मातंग जातीला भारतीय राज्यघटनेने अनुसुचित जातीत समाविष्ट केलेले आहे. भारतातील ११ राज्यात मातंग समुदायाला अनुसुचित जाती मध्ये समाविष्ठ केले आहे.

मातंग समाज हा मुळचा रांगडा, आक्रमक तरीही प्रामाणिक तसेच गावचा संरक्षणकर्ता समाज होता.या समाजाचा भारताला स्वातंत्र मिळवुन देण्यात खुप मोटा वाटा आहे.या समाजाचे काही क्रांतिकारी होवुन गेले परंतु भारतातल्या जातिय वादांच्या भोवर्यात त्यांचा इतिहास लिहीला गेला नाही. छत्रपती शिवरायांच्या काळात देखील गडांचे, घरे, चौक्यांचे पहारे तसेच काही ठिकाणी किल्लेदाराची जबाबदारीही मातंग समाजाकडे होती. त्या काळात मातंगांच्या शौर्याची काही उदाहरणे सापडतात. यांत शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून रायगडावर तोफ चढवणारे 'सर्जेराव मांग' व बाजी पासलकर या महाराजांच्या शिलेदाराची उमदी घोडी चोरून विजापूरकराला भेट देण्यासाठी घेऊन जाणाऱ्या मर्कतराव व सोनू दळवीचा कर्दनकाळ ठरलेले बाजी पासलकरांचे विश्वासू सहकारी जातीने 'येल्या मांग' होते. शिवाजीकालीन बखरीत व पोवाड्यांत यांचा उल्लेख आढळतो.

मावळात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहतूक सेवा

वडगाव मावळ :- आमदार सुनिल शेळके यांच्या वतीने ग्रामीण भागातील बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी घर ते परीक्षा केंद्र अशी मोफत सेवा सुरु करण्यात आली आहे. या उपक्रमाचे सलग सातवे वर्ष असून दरवर्षी या उपक्रमाचा अडीच हजार विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता बारावीची परीक्षा बुधवारपासून (दि.२१) सुरु झाली आहे.मावळ तालुक्यातील पाच परीक्षा केंद्रावर ४७३८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी असलेल्या परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचणे आवश्यक असते.परंतु इतर वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहणे प्रत्येक विद्यार्थ्याला शक्य नसते.ही गरज ओळखून मावळचे आमदार सुनिल शेळके यांच्या पुढाकारातून सन २०१६-१७ पासून तालुक्यातील विविध भागातून घर ते परीक्षा केंद्र अशी मोफत वाहतुक सेवा सुरु करण्यात आली आहे.

तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी कॉलेज केंद्रावर २०९५ विद्यार्थी, व्हीपीएस हायस्कूल लोणावळा १४५० विद्यार्थी, पवना ज्यु.कॉलेज पवनानगर ३७० विद्यार्थी, पंडित नेहरु माध्य.विद्यालय कामशेत ४८५ विद्यार्थी, श्री शिवाजी विद्यालय देहूरोड ३३८ विद्यार्थी यंदा बारावीची परिक्षा देत आहेत.आंदर मावळ,पवन मावळ,नाणे मावळ भागातील पवनानगर,कान्हे, कार्ला, शिवणे, उर्से,थोरण,चिखलसे, निगडे,आंबळे, इंदोरी,पाथरगाव, खांडी आदी गावांमधून विद्यार्थ्यांना परिक्षा केंद्रावर जाण्या-येण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थी इतर वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहिल्यास परिक्षेला उशीर होऊन शैक्षणिक नुकसान होण्याची संभावना असते. घरापासुन परिक्षा केंद्रावर वेळेत पोहोचले पाहिजे.तसेच परिक्षेच्या काळात अभ्यासासाठी अधिक वेळ देखील मिळाला पाहिजे.यासाठी आमदार सुनिल शेळके यांनी योग्य नियोजन केल्याबद्दल पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने स्वराज्य सप्ताह निमित्त भव्य मोटरसायकल रॅली

हिंगोली : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यानिमित्त हिंगोली शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य मोटर सायकल रॅलीचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादीचे युवक शहराध्यक्ष स्वप्नील इंगळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

यावेळी शहरातील मुख्य मार्गावर रॅली काढून शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

या मोटरसायकल रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली शहराध्यक्ष केशवजी दुबे, सुरज वडकुते, सुजय देशमुख विशाल काळे बबलू सय्यद करण कल्याणकर नागेश आप्पा यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

विद्यार्थी साहाय्यक समितीचा येत्या रविवारी मेळावा

पुणे : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा ३५ वा स्नेहमेळावा रविवारी (दि. २५ फेब्रुवारी) आयोजिला आहे. माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत शिवाजी हाऊसिंग सोसायटी येथील समितीच्या लजपतराय विद्यार्थी भवन वसतिगृहात हा मेळावा होत असून, यंदा मेळाव्याचे प्रायोजकत्व मराठवाडा विभागातील माजी विद्यार्थ्यांकडे आहे, अशी माहिती मंडळाच्या कार्यवाह मनीषा गोसावी यांनी दिली.

ज्येष्ठ माजी विद्यार्थी आणि 'आदित्य फीचर्स'चे संचालक सुधीर मोकाशे हे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी, तर वनाधिकारी नंदकिशोर गोतमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांच्यासह समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.मेळाव्यात ज्येष्ठ कार्यकर्ते, देणगीदार व कर्मचारी यांचा सन्मान, विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सन्मान, कार्यपरिचय यासह गप्पा-गोष्टी,जुन्या आठवणींना उजाळा दिला जातो. या मेळाव्याला जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

विनयशीलतेला संवेदनशीलतेचा आधार

सटाणा आगारातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची कामगिरीच बहारदार

सटाणा, नाशिक : आपल्या आस्थापनेतील सामान्य कर्मचारी आजारपणात असताना त्याचा वैद्यकिय उपचार चांगल्या पद्धतीने व्हावा, त्याची प्रकृती लवकरात-लवकर पुर्वपदावर यावी, उपचार घेताना आर्थिक मर्यादांचा अडसर निर्माण होऊ नये यासाठी सटाणा आगारातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी संवेदनशीलतेचा आदर्श उभा केला आहे.

राज्य परिवहन मंहामंडळाच्या सटाणा आगारात वामनराव किसनराव देवरे हे कंत्राटी पद्धतीने स्वच्छतादूत म्हणून कार्य करतात ते अत्यंत विनयशील व नम्र कर्मचारी म्हणून सर्वश्रुत आहेत, कोणतेही काम असो वामनराव हे कधीही त्या कामाला नाही म्हणत नाहीत असे अजातशत्रू व विनम्र वामनराव अल्प आजाराने व्याधीग्रस्त झाले. त्यांच्या व्याधीवर उपचारासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होणार होता, म्हणून सटाणा आगारातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वामनराव यांच्या वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक स्वरूपात मदत करायचे ठरवले.

त्या अनुषंगाने दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ रोजी आगारातील सर्व अधिकारी पर्यवेक्षक व कर्मचारी यांच्या माध्यमातून उभारलेला निधी प्रकृती स्वास्थतेसाठी शुभेच्छा देऊन लिफाफा बंद आर्थिक मदत ही वामनराव देवरे यांच्या हाती सोपविली.

सटाणा आगाराचे व्यवस्थापक राजेंद्र अहिरे यांनी जेव्हापासून या आगाराचा पदभार हाती घेतला तेव्हापासून या आस्थापनेच्या कामात व दर्जात मोठा बदल जाणवू लागला आहे. स्वच्छतेच्या अभियानात विभागीय स्तरावर अव्वल स्थानावर येणे, परिसरात रंगरंगोटी-स्वच्छता, निटनेटकेपणा, प्रवासीकेंद्री धोरणाला प्राधान्य, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना मानवी दृष्टीकोनातून समजून घेत आस्थापनेत कौटूंबिक जिव्हाळा निर्माण करणे आणि या सर्व प्रक्रियेतून दर्जाही हमी मिळवणे हे त्यांच्या व्यवस्थापकिय कौशल्याचे गुणे अधोरेखित करण्यासारखे ठरले आहेत.

कर्तव्यशीलबरोबरच संवेदनशीलतेची कास धरत समाजशीलतेचा वसा जपणे ही त्यांची शिकवण आपल्या सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना असते, त्यांच्या या भूमिकेला त्यांचे सहकारी आणि कर्मचारी मोठ्या आनंदाने साथ देतात, याच जिव्हाळ्यातून आपल्या आगारातील स्वच्छतादूत वामनराव देवरे यांच्या वैद्यकिय उपचारासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या पदरकमाईतून मदत केली.या विनयशील स्वच्छतादूताच्या उपचारासाठी आगारातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जो संवेदनशीलतेचा आधार दिला त्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर अपघात; बाप-लेकीचा जागीच मृत्यू

वडगाव मावळ : पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आढे गावाच्या हद्दीत कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील बाप लेकीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. पाचजण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात बुधवारी (दि. २१) सकाळी सहा वाजता घडला.

सुनील थोरात, मयुरी थोरात अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. अक्षय सुनील थोरात (वय २७), दत्तात्रय थोरात (वय ६०), तेजल थोरात (वय २५), शारदा थोरात (वय ४८), राजवीर थोरात (वय ३) अशी जखमींची नावे आहेत.

वरीष्ठ पोलिस निरीक्षक दिगंबर सुर्यवंशी यांनी मिळालेल्या माहितीनुसार, थोरात कुटुंब कारने (एमएच १४/एलबी ४६३०) मुंबईहून पुण्याला येत होते. बुधवारी पहाटे सहा वाजताच्या सुमारास चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार ७९ किलोमीटर येथे संरक्षक कठड्याला धडकली. जोरात बसलेल्या धडकेमुळे कारच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. तर कार मधील दोघांचा मृत्यू झाला असून पाचजण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, देवदूत यंत्रणा आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पुढील तपास शिरगाव परंदवडी पोलीस करीत आहेत.

तुळजाई लेणी परिसरात पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांनी केला हल्ला

नारायणगाव : तुळजाई लेणी सोमतवाडी येथे आलेल्या पर्यटकांवर पुन्हा एकदा मधमाशांनी हल्ला केला आहे.

या हल्ल्यात पाच जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.जुन्नर रेस्क्यू टीम चे सदस्य राजकुमार चव्हाण, रूपेश जगताप, मगदूम सय्यद, लखन डाडर यांच्या मदतीने त्यांना तात्काळ १०८ च्या म्बुलन्स मधून प्रतिभा सावंत आणि चालक धीरज डोके यांनी ग्रामीण रुग्णालयात हलवले असून डॉक्टर कोकाटे हे त्यांच्यावर उपचार करत आहेत. या आठवड्यातील हा मधमाशांचा त्याच ठिकाणी झालेला दुसरा हल्ला आहे. यावर नेमकं काय करता येईल याबाबत प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.

मुख्य संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, डंडी, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

विचारांच्या कक्षा ओलांडून भारत महासत्ता होण्यासाठी पुढाकार घ्या : शंकर जगताप

शहर भाजपातर्फे विविध ११ आघाडयांची जम्बो कार्यकारिणी जाहिर

पिंपरी : देशाच्या युवाशक्तीला दिशा देण्याची जबाबदारी सर्वांची आहे. नागरिकांच्या वैयक्तिक सहभागातूनच राष्ट्र उभारणी होते. विकसित भारताच्या संकल्पनेला प्राधान्य देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी विकसित भारत २०४७' संकल्पनेसाठी प्रत्येकाने आपल्या विचारांच्या कक्षा ओलांडून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदावर विराजमान करून भारत महासत्ता होण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.

भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा आचार्य अत्रे सभागृह, नेहरूनगर येथे मंगळवारी पार पडला. यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शंकरभाऊ जगताप यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, भाजपा महिला मोर्चा, सांस्कृतिक प्रकोष्ठ, बेटी बचाव बेटी पढाओ, किसान मोर्चा, वैद्यकीय प्रकोष्ठ, दिव्यांग सेल, ट्रान्सपोर्ट सेल, अल्पसंख्यांक मोर्चा, जैन प्रकोष्ठ, कामगार मोर्चाच्या जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्या. तसेच, विविध प्रकोष्ठचे ४५० हून अधिक

नवनियुक्त पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार महेशदादा लांडगे, आमदार उमाताई खापरे, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश युवा मोर्चा सचिव अजित कुलथे, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे, प्रदेश सचिव तेजस्विनी कदम, माजी महापौर आर. एस. कुमार, मंडल अध्यक्ष निलेश अष्टेकर, सोमनाथ भोंडवे, नगरसेविका शारदा सोनवणे, युवा मोर्चा सरचिटणीस दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, जैन प्रकोष्ट संयोजक संदेश गदिया, कविता हिंगे, माजी युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चौंधे, किसान मोर्चा चिटणीस प्रेमनाथ बोराटे, बेटी बचाव बेटी पढाव संयोजिका प्रीती कामतिकर, ट्रान्सपोर्ट सेल अध्यक्ष दीपक मोढवे, अल्पसंख्यांक आघाडी प्रदेश सचिव जमीर मुल्ला, जमील औटी, सनदी लेखा प्रकोष्ट बबन जंगले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शंकर जगताप पुढे म्हणाले, मोदीजींच्या गॅरंटीला सर्वांनी प्रतिसाद दिला आहे. भारताचे जागतिक स्तरावरील स्थान मजबूत झाले आहे. भारत आता जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून जगातील सर्वात शक्तिशाली देशांपैकी एक म्हणून उदयास पावत आहे. आपले ध्येय, संकल्प विकसित भारतासाठी असले पाहिजे, याद्वारे सुसंस्कारित, बुद्धिमान, अशी युवा पिढी तयार होईल आणि आगामी काळात देशाचे नेतृत्व करेल, देशाला योग्य दिशा देईल. डिजिटल इंडिया, स्वच्छता अभियान यासह कोरोना काळ आपण पहिला आहे. युवा शक्तीमध्ये परिवर्तन करण्याची ताकद आहे. देश उत्तुंग भरारी घेत आहे. अनेक देशांनी

देशाच्या विकासासाठी लोकचळवळ होणे गरजेचे आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्मीती आणि २०२७ पर्यंत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी केला आहे. आगामी लोकसभा निवडणुक राष्ट्रिहतासाठी महत्वाची असून ४०० हून अधिक जागांवर भाजपाला विजयी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करायचे आहे. याकरीता बूथ स्तरावर संघटना बळकट करून पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपली जबाबदारी स्विकारून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांनापर्यंत पोहोचविण्यात येत आहे

- शंकर जगताप,
शहराध्यक्ष - भाजपा, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा

योग्य वेळेत जलद बदल करुन त्या ठराविक कालावधीत देशाचा विकास केला आहे.

आता हीच योग्य वेळ आहे. अमृत काळाच्या प्रत्येक क्षणी आपल्यापुढे विकसित देश म्हणून उभे करण्याचाच ध्यास असला पाहिजे. आज देश अनेक क्षेत्रात प्रगती करीत आहे. आशियाई खेळांमधील कामगिरी, जन-धन खाती, कोविड काळात लसींचा विकास, चांद्रयान मिशन, टीबी नियंत्रण, डिजिटल पायाभूत सुविधांची निर्मिती यामध्ये उत्तम कामगिरी केली आहे. तसेच जी-२० शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनामुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उंचावली आहे. भारतासाठी हीच योग्य वेळ आहे.

त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करून देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्वांनी सहभाग घेवून पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या गॅरंटीचा सर्वांना विश्वास द्या, असे सांगत आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस संजय मंगोडेकर यांनी केले.

हडपसरच्या विविध नागरी समस्यांसाठी मनपा अतिरिक्त आयुक्त डॉ.कुणाल खेमणार यांना रिपाइंचे निवेदन

हडपसर : हडपसर भागातील विविध नागरी समस्यां संदर्भात पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ.कुणाल खेमनार यांना सुरज गायकवाड यांच्या शिष्टमंडळांनी भेटुन हडपसर भागातील समस्यां सोडविण्या बाबत चर्चा केली. दि. ४/१२/२०२३ व घेतलेल्या आंदोलनाचे हडपसर क्षेत्रीय कार्यालय कांहीच केले नसल्याने पुन्हा दि २४/१/२०२४ रोजी मनपा कार्यालयावर जागरण गोंधळ अंदोलन करुन देखील समस्यां जैसे थे असल्याने आंदोलन कर्त्यांमध्ये नाराजी आहे.

समाज व नागरी हिताच्या व ठेकेदार व कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी तसेच वाहण चालकांसाठी अपघात विमा आरोग्य विमा व दर दोन महिन्यातुन आरोग्य शिबीर घेण्यात यावे तसेच हडपसर क्षेत्रीय कार्यालयातील अनागोंदी कारभार शासन नियम धाब्यावर बसवून गेल्या आठ ते दहा वर्षापासून बदल्या न झालेले आरोग्य निरीक्षक यांच्या बदल्या करण्यात याव्यात अशी विविध मागण्यांसह इतर समाजहिताच्या मागण्यांबाबत सांविधानिक लोकशाही मार्गाने अंदोलन करून निवेदन देण्यात आले होते परंतु तरीही काही मागण्या मार्गी लागत नसल्याने पुन्हा दि.२८/२/२०२४ रोजी हडपसर क्षेत्रीय कार्यालय येथे बॅन्ड वाजवुन मागण्या प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यां विरोधात लोकशाही मार्गाने निषेध आंदोलन करणार आहोत असे सुरज गायकवाड यांनी अतिरिक्त आयुक्त खैरनार यांना निवेदन देण्यात आले.शिष्टमंडळात

रिपाइं (आठवले) श्रमिक ब्रिगेड चे पुणे शहर अध्यक्ष सुरज गायकवाड, पुणे शहर उपाध्यक्ष महादेव कांबळे, श्रमिक ब्रिगेड

खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे तिकीट कोणी ब्रह्मदेव आला तरी रोखू शकणार नाही : प्रल्हादराव साळुंखे पाटील

साखरवाडी : येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे तिकीट कोणी ब्रह्मदेव आला तरी रोखू शकणार नाही हे तितकेच खरे असल्याचे फलटण तालुक्याचे ज्येष्ठ नेते प्रल्हादराव साळुंके पाटील यांनी सांगितले

निरा देवघर प्रकल्प अंतर्गत निरा देवघर सुरवडी शाखा कालवा (बंदिस्त पाईप) या कामाच्या शुभारंभ भूमिपूजन समारंभ प्रसंगी प्रल्हादराव साळुंखे पाटील बोलत होते

यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील जिजामाला नाईक निंबाळकर विश्वासराव भोसले हनुमंत मोहिते राम निंबाळकर अभिजीत नाईक निंबाळकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते

पाटील म्हणाले रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना तिकीट मिळू नये म्हणून विरोधकांच्याकडून हे डावपेच शेवटच्या क्षणापर्यंत चालणार असून या डावपेचाची अफवा

संपूर्ण माढा मतदारसंघात चालली असल्याचे पाटील यांनी सांगितले

प्रल्हादराव साळुंखे पाटील पुढे म्हणाले या फलटण तालुक्यामध्ये गेल्या २५ ते ३०वर्षापासून येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीमध्ये धोम बलकवडी व नीरा देवघरच्या पाण्याचे गाजर दाखवण्याची प्रथा पडली पुन्हा निवडणूक आली की पुन्हा तीच कारण पुढे करायची अशा प्रकारची कामे या तालुक्यातील प्रस्थापितांच्याकडून केली गेली असून आहेत या लोकसभेच्या निवडणुकीपासून परिवर्तनाची लाट आली असल्याचे पाटील यांनी सांगून ते पुढे म्हणाले आपल्या तालुक्यात रेल्वे बाबत कायम टिंगल केली जाते परंतु खासदारांनी स्वतः च्या ताकदीवर ही रेल्वे आणली भविष्यात फलटण बारामती फलटण पंढरपूर रेल्वे चालू होऊन फलटण हे या तालुक्यातील मोठे जंक्शन होणार असल्याचे सांगून पाटील म्हणाले रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी गेल्या अडीच वर्षांमध्ये विकास कामाचा डोंगर रचला आहे मागील पाच वर्षाच्या कालावधीत दोन वर्षे त्यांची कोरोना मध्ये गेली त्यावेळी राज्यात विरोधी सरकार होते त्यामुळे या तालुक्यातील प्रस्थापितांच्या हातात विकासाच्या नाड्या असल्यामुळे विद्यमान प्रस्थापितांनी त्यावेळी खासदारांची कामे हाणून पाडण्याचा प्रयत्न केला नंतरच्या काळात भाजपच्या विचाराचे सरकार आले आणि खासदारांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून या अडीच वर्षाच्या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघाला समान न्याय देण्याचा प्रयत्न केला या माढा मतदारसंघातील अनेक वरिष्ठ नेत्यांचे सहकार्य खासदारांना लाभले त्यामुळेच यश आले असल्याचे पाटील यांनी सांगून या तालुक्यात प्रचंड कामे रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या माध्यमातून झाली गेली पंचवीस वर्षे ही कामे झाली नव्हती ती या वेळी झाली धरणे बांधून पंचवीस वर्षे झाली तरी सुद्धा कालव्यांची कामे करता आली नाहीत असे सांगून पाटील म्हणाले २५ वर्षात या तालुक्यात प्रबळ विरोध करणारा माणूस भेटला नव्हता आमचा गळा घोटण्याची काम केले.

हिंदुरावांनी विरोध केला त्यांचा गळा घोटण्याचे काम केले जो जो प्रतिस्पर्धी या तालुक्यात निर्माण होऊ लागला की अशा माणसांच्या बाबतीत या विद्यमान प्रस्थापितांच्या कडून विरोध केला जातो भविष्यकाळात कोणी माणूस अडचणीचा वाटला की येथील प्रस्थापितांच्याकडून विरोध होतच असतो परंतु आता आम्हाला कितीही अडचणी आणण्याचा प्रयत्न केला तरी तुम्हाला या निवडणुकीत धडा शिकवल्याशिवाय राहणार नसल्याचे पाटील यांनी श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांचे नाव न घेता सांगितले रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना तिकीट मिळणार नाही हे शेवटच्या क्षणापर्यंत चालणार आहे पण देशांमध्ये ५४३ खासदारांपैकी टॉपच्या खासदारांमध्ये या खासदारांचा आठवा नंबर लागतो खासदारांचे तिकीट कोणी ब्रह्मदेव आला तरी कापू शकणार नाही तिथे मेरिट लागते गेली ३० ते ४० वर्षे मी राजकारणात असून या राजकारणाचा असलेला अनुभव आपण या निवडणुकीच्या माध्यमातून खासदारांच्या पाठीशी उभा करणार असल्याचे सांगून पाटील म्हणाले या लोकसभेच्या निवडणूकमध्ये खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचा मुख्य शिलादार म्हणून मी काम पाहणार असल्याचे पाटील शेवटी म्हणाले.

म'श्वर मध्ये १०० वे विभागीय नाट्य संमेलन

महाबळेश्वर : महाराष्ट्राचे नंदनवन महाबळेश्वर येथे २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान होत असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या विभागीय नाट्यसंमेलनाची लगबग सुरु झाली आहे येथील पोलीस परेड मैदानावर मुख्य रंगमंच उभारण्याचे काम देखील सुरु झाले आहे त्याचप्रमाणे या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक नाट्यकर्मी कलावंत रंगीत तालमीच्या तयारीमध्ये गुंतले आहेत यानिमित्ताने संपूर्ण शहर सुशोभित करण्यात येणार असून महाबळेश्वरकर संमेलनासाठी येणाऱ्या नाट्यकर्मींच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहेत.

या संमेलनाची माहिती देण्यासाठी येथील सनी इंटरनॅशनल मध्ये नाट्य परिषद शाखेच्यावतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते नाट्य परिषद महाबळेश्वर शाखेचे अध्यक्ष डी एम बावळेकर महाबळेश्वर पालिकेचे मुख्याधिकारी व प्रशासक योगेश पाटील नियामक मंडळ सदस्य राजेश कुंभारदरे कोषाध्यक्ष सतीश लोटके उपाध्यक्ष संतोष शिंदे बबनराव ढेबे संजय दस्तुरे विलास काळे आदी मान्यवर उपस्थित होते

शाखेचे अध्यक्ष डी एम बावळेकर महाबळेश्वर पालिकेचे मुख्याधिकारी व प्रशासक योगेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली महाबळेश्वर येथील

नाट्य चळवळीस गती मिळावी या उद्देशाने हे संमेलन येथे आयोजित करण्यात आले असून या संमेलनामुळे येथील नाट्य कर्मीना नवी ऊर्जा मिळणार आहे व भविष्यात महाबळेश्वरमधील कलाकार महाराष्ट्रभर चमकतील असा विश्वास व्यक्त करून बावळेकर म्हणाले की,यासाठी संमेलनाच्या पूर्वसंध्येस स्थानिककलाकारांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० ते ४.३० या वेळेत एकांकिका,नाट्य छटा व नाट्य संगीत व ४.३० ते ६.३० या वेळेत स्थानिक कलाकलारांचे ''गाढवाचं लग्न'' त्यात्यानंतर ६.३० ते ७.३० नाना जरा थांबा ना ही विनोदी एकांकिका सादर केली जाणार आहे तर आठ वाजता ''डोन्ट वरी हो जायेगा'' हे दिग्गज कलाकारांचे व्यावसायिक नाटक सादर केले जाणार आहे.

शनिवार २४ फेब्रुवारी सकाळी शहरातून दहा वाजता भव्य नाट्य दिंडीचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये सिने व नाट्य कलाकाराची विशेष उपस्थितीत असणार आहे या दिंडी मध्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध चित्ररथ सहभागी होणार आहेत या दिंडीचे मुख्य वैशिष्ट विविध राज्याचे वेशभूषा परिधान करून त्या राज्याचे नृत्य स्थानिक महिला सादर करणार आहेत त्याचप्रमाणे महाबळेश्वर तालुका वारकरी संघटना या दिंडीमध्ये पारंपरिक वेशात सहभागी होणार आहेत या दिंडीची सुरुवात वेण्णा दर्शन येथून होणार असून हि दिंडी बाजर पेठ मार्गे पोलीस परेड मैदानावर उभारण्यात आलेल्या छ शिवाजी महाराज नाट्य नागरी येथे या दिंडीचा समारोप होईल दिंडी पोचल्यानंतर या नाट्य संमेलनाचे उदघाटन दुपारी दोन वाजता महाबळेश्वर तालुक्याचे सुपुत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर परिषदेचे विश्वस्त,संमेलनाचे मुख्य निमंत्रक,उद्योगमंत्री उदय सामंत,पालकमंत्री शंभूराज देसाई,अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले,संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल जेष्ठ अभिनेते मोहन जोशी आ मकरंद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे उदघाटन सोहळ्यानंतर हास्यसम्राट प्रा अजितकुमार कोष्टी यांचा हसवणुकीचा कार्यक्रम होईल.

सायंकाळी ५.३० वाजता कुर्रर्रर्रर्र हे व्यावसायिक नाटक सादर केले जाणार आहे या नाटकामध्ये प्रसिद्ध हास्य कलावंत पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी विशाखा सुभेदार प्रियदर्शन जाधव आदी प्रसिद्ध कलाकार सहभागी होणार आहेत रात्री आठ वाजता नाट्य व सिनेकलावंतांनी सादर केलेल्या संगीत रजनी हा कार्यक्रम होणार आहे

रवीवार २५ फेब्रुवारी रोजी देखील भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पालिका प्रशासक योगेश पाटील यांनी दिली सकाळी १०.३० वाजता स्थानिक महिला व नाट्यकर्मी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम ११ ते ४ खास लहान मुलांसाठी तीन बाळ नाट्यांचा धमाका उडणार आहे या तीन बालनाट्यातील पहिले पुष्प महाबळेश्वर गिरिथन शिक्षण मंडळांच्या वतीने स्थानिक शालेय विद्यार्थी शिवराज्याभिषेक सोहळा हे बालनाट्य सादर करणार आहेत दुपारी १२ ते २ वाजता फुग्यातला राक्षस व टेड्डी आणि डोरेमॉन हे दोन व्यावसायिक बालनाट्य सादर केली जाणार आहेत अश्या पद्धतीने या संमेलनामध्ये बालचमूंना बालनाट्याच्या माध्यमातून आगळीवेगळी पर्वणीच मिळणार आहे दुपारी ३ ते ४ वाजता नाटक माझ्या चष्म्यातून या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून या परिसंवादामध्ये खा श्रीनिवास पाटील डॉ भावेश भाटिया जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ समीर शेख हे सहभागी होणार आहेत या परिसंवादाचे संचालन प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते हृषीकेश जोशी करणार आहेत चार वाजता संमेलनाचा हस्तांतरण सोहळा आयोजित करण्यात आला असून या सोहळ्यासाठी डॉ जब्बार पटेल सौ नीलम शिर्के- सामंत व खा श्रीनिवास पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत ५ ते ७.३० या वेळेत सिनेव नाट्य कलावंत महाराष्ट्राची लोकधारा हा रंगारंग कार्यक्रम होणार आहे

संमेलनाचे आकर्षण ---

अवधूत गुप्ते नाईट २५ फेब्रुवारी सायंकाळी संमेलनाचा समारोप अवधूत गुप्ते नाईट या कार्यक्रमाने होणार असून यामध्ये १५० कलाकार व तंत्रज्ञ यांचा सहभाग असणार आहे.

शिवनेरी मॅरेथॉन - २०२४ स्पर्धेत आशुतोष दळे प्रथम

वळती : शिवजयंती निमित्त शिवनेरी (ता . जुन्नर) येथे झालेल्या शिवनेरी मॅरेथॉन - २०२४ स्पर्धेत दहा किलोमीटर गटात वळती (ता. आंबेगाव)येथील आशुतोष दगडू दळे याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन या संस्थेमार्फत दरवर्षी शिवजयंतीनिमित्त शिवनेरी मॅरेथॉन स्पर्धे चे आयोजन केले जाते. यंदा या मॅरेथॉन स्पर्धे त पुणे , मुंबई , धुळे , जळगाव , नाशिक , नांदेड , गुजरात मधील धावपटूंचा समावेश होता.यामध्ये दहा किलोमीटर गटात आशुतोष दगडू धुळे याने प्रथम क्रमांक पटकावला .त्याने १० किलोमीटरचे अंतर ४१ मिनिट ७ सेकंदात पार केले.त्याला रोख तीन हजार रुपये , पदक व ट्रॉफी देण्यात आली. प्रथम क्रमांक विजेत्या आशुतोष दळे याला शिक्षक विजय काळे यांचे मार्गदर्शन लाभले . निमगाव सावा येथील दिलीप वळसे पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्य छाया जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

ईचलकरंजी पाणी योजनेच्या जॅकवेलमधून पाणी पुरवठा बंद करून टाळे ठोकू : वैभव उगळे

कुरुंदवाड : कुरुंदवाड शिरढोण दरम्यानच्या पंचगंगा नदीपात्रातील बंद अवस्थेत असणारी इचलकरंजी कृष्णा पाणी योजनेची पाईप लाईन काढून घ्यावी यासाठी इशारा दिला होता. येत्या १५ दिवसात पाईप लाईन काढून घेऊ असे आश्वासन इचलकरंजीचे उपायुक्त डॉ.प्रदीप ठेंगल यांनी लेखी आश्वासन दिले आहे. अश्वासनानुसार कार्यवाही न झाल्यास कुरुंदवाड हद्दीतील ईचलकरंजी पाणी योजनेच्या जॅकवेलमधून पाणी पुरवठा बंद करून टाळे ठोकू असा इशारा शिवसेना (उबाठा)गटाचे जिल्हाप्रमुख वैभव उगळे यांनी दिला आहे.

इचलकरंजी महापालिका उपयुक्त ठेंगल यांना निवेदन देताना शिवसेना (उबाठा)चे पदाधिकारी.

दरम्यान जिल्हाप्रमुख उगळे यांनी दयानंद मालवेकर,बाबासाहेब सावगावेसह पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने उपयुक्त ठेंगल यांची भेट घेऊन निवेदन दिले.

इचलकरंजी नगरपरिषदेच्या कार्यकाळात कृष्णा नदीतून थेट पाईपलाईन योजना करण्यात आली.कुरुंदवाड शिरढोण पुलाजवळ पंचगंगा नदी पात्राच्या खडकावरून नेण्यात आली होती. प्रत्येकवर्षी हिवाळ्यात जलपर्णीचा उगम होऊन ती उन्हाळ्यात चार महिने या पाईपलाईनला तुंबून तेरवाड बंधाऱ्यापर्यंत जलपर्णीचे मैदान तयार होत आहे. अनेकांच्या शेती पंपाच्या मोटारी खराब झाल्या आहेत.प्रत्येक वर्षी ही परिक्रमा सुरू असते. म्हणून ८ दिवसांपूर्वी इचलकरंजी महापालिकेला पाईप लाईन काढून घेण्यासाठी शिवसेना (उबाठा) ने इशारा दिला होता.

मंगळवारी शिष्टमंडळाने भेट घेतली असता १५ दिवसात पाईप-लाइन काढून घेण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.त्यानुसार कार्यवाही न झाल्यास जॅकवेल टाळे ठोक आंदोलन करण्यात येणार आहे. यावेळी सुहास पासोबा,प्रकाश सुतार,विष्णुपंत माळी, विजय मोगणे,संजय चव्हाण,मिलिंद गोरे,अथर्व माने,सागर लोहार,स्वप्नील चव्हाण,रोहित जाधव,आनंदा गावडे आदी उपस्थित होते.

रेवडी येथील बौद्ध वस्तीला कायमस्वरूपी पक्का रस्ता देण्याबाबत मागणी

सातारा रोड : भारत देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गौरव करण्यात येत आहे. परंतु वास्तविक पाहता आजही अनेक खेडी हे विकासापासून वंचित आहेत .त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील रेवडी कोरेगाव येथे साठ वर्षापासून बौद्ध वस्तीला जोडणारा पक्का रस्ता नसल्याने स्वातंत्र्याची व्याख्या काय ? असा मार्मिक प्रश्न केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक न्याय विभागाचे सातारा जिल्हा अध्यक्ष रमेश अनिल उबाळे यांनी हा रस्ता त्वरित करावा अशी मागणी केली आहे. गेले काही वर्ष रेवडी ग्रामपंचायतीस बौद्ध धम्म ग्रामस्थ कर भरत आहेत. ४० ते ५० वर्ष वहिवाटीचा पाणंद रस्ता ,डांबरीकरण करून कायमस्वरूपी द्यावा. यासाठी रेवडी येथील बौद्ध धम्म ग्रामस्थ व बांधवांनी श्री रमेश उबाळे यांनी या बाबत लक्ष वेधून पक्का रस्ता तयार करण्यासाठी सहकार्य करावे. अशी मागणी केली आहे.त्यानुसार मागासवर्गीय समाजाला न्याय देण्यासाठी श्री रमेश उबाळे यांनी पुढाकार घेतला आहे.

रेवडी येथे जुना रस्ता असून शेतकरी व बौद्ध धम्म मागासवर्गीय सहा कुटुंब या रस्त्याला घरे बांधून वास्तव्यास आहेत . सदर सहा कुटुंब ग्रामपंचायत घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबती ,ग्रामपंचातीस कर भरत आहेत . त्यांच्याकडे ८ ड उतारा, सात बारे, रहिवासी दाखला, वीज बिल ,आधार कार्ड सर्व शासकीय कागदपत्रे असून ,ग्रामपंचायतीचे करदाते आहेत. .तरीसुद्धा मागासवर्गीय समाजाचे असल्या कारणास्तव फक्त त्यांच्यावर राजकीय दबावापोटी अन्याय केला जात आहे का? असा सवाल यानिमित्त उपस्थित केला जात आहे.

रेवडी गावत बौद्ध समाजातील लोक आहेत . रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी न हरकतीचा दाखला व शंभर रुपयाच्या बॉण्ड वर सह्यानिशी आपला रस्त्याला कोणतीही हरकत नाही. या संदर्भातील बॉण्ड दिलेला आहे .

यात कोणी अडथळा करत असेल तर ,ग्रामपंचायत यांनी पर्याय काढून हा रस्ता खुला करून द्यावा. सद्य परिस्थितीमध्ये मुरमीकरण झालेला असून, गेले साठ वर्षे हा रस्ता वहिवाटीत आहे .

ग्रामपंचायत कर दातांची रस्ता ,गटर, वीज ,पाणी ही व्यवस्था ग्रामपंचायतीने पूर्ण करणे बंधनकारक आहे , कृपया या विषयाचा सखोल चौकशी करून न्याय देण्यासाठी प्रयत्न करावा व बौद्ध बांधवांना न्याय द्यावा. अशी मागणी श्री रमेश उबाळे यांनी केलेले आहे

यासाठी प्रसंगी आंदोलन करण्याची त्यांनी भूमिका घेतली आहे त्यांच्या समवेत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी विवेक खरात ,मनोज खरात व अतुल खरात व यशवंत खरात व आनंदराव खरात व नवीन खरात व वसंत खरात व सर्जेराव खरात व सिद्धार्थ खरात व अतुल देशमुख व अनिल देशमुख उपस्थित होते.

शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करा हीच खरी शिवजयंती होईल : संपत गारगोटे

वडगाव मावळ : शिवजयंती उत्सव हा नाचून साजरा करण्यापेक्षा वाचून साजरा करावा. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार मनामनात व घराघरात पोहचावा. छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे. जगात शिवजयंती विचाराने साजरी केली जाते, युवक डीजे लावून जयंती साजरी करतात. शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करा हीच खरी शिवजयंती होईल असे प्रतिपादन शिवव्याख्याते संपत गारगोटे यांनी केले.

येथील श्री संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ कला वाणिज्य बीबीए महाविद्यालयात बुधवारी (दि.२१) शिवजयंती उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी शिव पुतळ्याचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शिवजयंती उत्सवानिमित्त वडगाव येथील ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिर ते महाविद्यालयापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. व्याख्यान झाल्यावर विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिवजयंती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात पुढाकार घेतला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तुकाराम असवले, संचालक प्रल्हाद जांभुळकर, दत्तात्रय असवले, प्राचार्य अशोक गायकवाड, प्रा. महादेव वाघमारे, डॉ.शीतल दुर्गाडे, प्रा. शीतल शिंदे, प्रा.रोहिणी चंदनशिवे, प्रा. योगेश जाधव, प्रा. जया धावारे, प्रा. संतोष शिंदे, प्रा. अशोक कोकाळे, प्रा.सुखदेव जाधव, प्रा. अनिल कोद्रे, अनिता भांबळ, मंगल सस्ते व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

शायनिंग महाराष्ट्र हे भूगर्भापासून अंतराळापर्यंतच्या माहीतीचे प्रदर्शन : जिजमालाताई नाईक-निंबाळकर

शायनिंग महाराष्ट्र प्रदर्शनाचा थाटात समारोप : तीन दिवसात आठ हजार विद्यार्थी- नागरिकांची प्रदर्शनाला भेट !

फलटण, : शायनिंग महाराष्ट्र या प्रदर्शनातून फालटणवाशियांना भुगर्भातील सापडलेल्या वस्तु पाहायला मिळाल्या. जमिनीतील पाणी शोधून ते शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्याच्या योजनांबद्दल सांगण्यात आले. आभाळातून ड्रोनद्वारे शेतात औषध फवारण्याची योजना आणि युद्ध करतात हे कळले. याशिवाय आभाळातुन मारा होणाऱ्या शस्त्रांचीही प्रात्यक्षिक दिसले. म्हणजे भगर्भापासुन ते अंतराळापर्यन्तच्या सर्व गोष्ठीची माहिती शायनिंग महाराष्ट्र या प्रदर्शनाने फलटण वाशियाना दिली, असे गौरवोद्गार सौभाग्यवती जिजामालाताई रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी काढले.

दिल्ली येथील सांसा फाउंडेशनच्यावतीने फलटण येथील शुभारंभ लॉन्स येथे भरविण्यात आलेल्या शायनिंग महाराष्ट्र २०२४ या प्रदर्शनाचा बुधवारी थाटात समारोप झाला. यावेळी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी मंचावर भारतीय मानक ब्यूरोचे हर्ष शुक्ला,

जीओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या संचालिका रीना मिश्रा, डीआरडीओचे शास्त्रज्ञ अजय खरड़ आणि फारुख अहमद, बायोटेक्नोलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. सारंग सातुर हे मंचावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या प्रदर्शनाला तीन दिवसात फलटण शहर आणि तालुक्यातील शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी, महिला, नागरिक, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी भेट दिली. सरकारच्या विविध खाती आणि योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी यासाठी माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या कल्पकतेतून हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाचा बुधवारी तिसरा दिवस होता.

भारतीय मानक ब्यूरोच्या अधिकाऱ्यांनी दिला मानक पाहुन खरेदी करण्याचा सल्ला !

हे प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या सर्वांना बीआईएसचे अधिकारी हर्ष शुक्ला यांनी मानक चिन्हांची माहिती दिली. सोने घेताना हॉलमार्क, वस्तु घेताना आएसआय पाहुनच घेण्याचा सल्ला या अधिकाऱ्यानी फलटणकरांना दिला.

बेस्ट स्टॉल धारकांचा गौरव !!

यावेळी प्रदर्शनात सहभागी झालेल्या केंद्र सरकारच्या विविध खात्यांना बेस्ट स्टॉल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यात बेस्ट इंटरैक्टिव स्टॉल: भारतीय मानक ब्यूरो, बेस्ट डिस्प्ले स्टॉल: जीओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया. बेस्ट इन्फॉर्मेटिव्ह स्टॉल: डीआरडीओ. बेस्ट स्टॉल इन अर्थ एंड सायन्स: मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्स. बेस्ट स्टॉल इन सायन्स एंड टेक्नॉलॉजी: डिपार्टमेंट ऑफ बायो टेक्नोलॉजी. बेस्ट स्टॉल इन आयटी एंड कम्युनिकेशन : आयटीआय लिमिटेड. बेस्ट स्टॉल इन केमिकल फल्टीलायझर: आरसीएफ. बेस्ट स्टॉल इन सस्टेनेबल डेवलपमेन्ट: वेस्टर्न कोल फील्ड. बेस्ट स्टॉल इन इकोफ्रेंडली: महाराष्ट्र-ओडिसा-सिक्किम-नागालैंड-मेघालय बाम्बू. बेस्ट स्टॉल इन एग्रीकल्चर: आईसीएआर. बेस्ट स्टॉल इन एनिमल हजबंडरी: सेंट्रल पोल्ट्री डेवलोपमेन्ट ऑर्गनझेशन. बेस्ट स्टॉल इन वॉटर रीसोर्सेस: अटल भूजल योजना. बेस्ट स्टॉल इन टुरीझम: इंडिया टुरीझम.

फलटणच्या वेणूताई चव्हाण फार्मसी कॉलेजच्या प्रकल्पाला पहिले पारितोषिक !

या प्रदर्शनात स्थानिक विद्यार्थ्यांना प्रकल्प मांडण्याची संधी देत स्पर्धा घेण्यात आली. यात वेणूताई चव्हाण फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मांडलेल्या टॅबलेट मशिनला सर्वोत्तम प्रकल्पाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बार्टीच्या संशोधकांना फेलोशीप न दिल्यास सत्ताधारी नेत्यांना ' प्रचार बंदी ' करणार!

मुंबई : बार्टीने पात्र ठरवलेल्या २०२२ सालातील पीएचडीच्या ७६१ संशोधकांना महाराष्ट्र सरकारने फेलोशिप फेब्रुवारीअखेरपर्यंत मंजूर करून वितरित करावी. अन्यथा सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना पुढील महिन्यापासून दलित - मागासवर्गीय विद्यार्थी राज्यभरात

' प्रचार बंदी ' करतील, असा इशारा संविधान समर्थक दलाचे नेते प्रा. डॉ. जी के डोंगरगावकर आणि प्रा. एकनाथ जाधव यांनी आज मुंबईत दिला.

फेलोशीपच्या मागणीसाठी २४ जानेवारीपासून राज्यभरातील शेकडो संशोधकांचे आझाद मैदानात साखळी धरणे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या लढ्याला भेट देवून पाठिंबा जाहीर केल्यानंतर डोंगरगावकर आणि जाधव यांनी ' प्रचार बंदी ' चा इशारा दिला.

महिनाभरापासून धरण

फेलोशीपच्या मागणीसाठी तीन महिन्यांहून अधिक काळ पुण्यातील बार्टीच्या कार्यालयासमोर आंदोलन केल्यानंतर संशोधकांनी मुंबईत येवून महिनाभरापासून आझाद मैदानात धरणे धरले आहे. मात्र राज्य सरकारने त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष चालवले आहे, असे सीमा वानखेडे, पल्लवी गायकवाड, वर्षा जाधव, प्रकाश

पट्टेकर,प्रकाश तारू या तरुण संशोधकांनी सांगितले.

आज त्यांच्या आंदोलनाला ज्येष्ठ नेते सतीश डोंगरे, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, जनता दल (सेक्युलर)चे राज्य

ट्रिपल इंजिन सरकारचा दुष्टपणा

बार्टी, सारथी आणि महाज्योती मार्फत फेलोशिप देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटवून २०० वर आणण्याचा निर्णय राज्य सरकारने ऑक्टोबर २०२३ मध्ये घेतला आहे. तो निर्णय २०२२ च्या बार्टीच्या संशोधकांना लागू करण्याचा दुष्टपणा 'ट्रिपल इंजिन ' सरकार करत आहे, असा आरोप डॉ. डोंगरगावकर यांनी केला.

महासचिव रवी भिलाणे, ऍड. हर्षल शाक्य, ऍड अनिल बागुल , भानुदास धुरी, सीताराम लव्हांदे यांनीही भेट देवून पाठिंबा दिला.

अडवणूक केवळ अनुसुचित जातींची

मराठा समाजासाठी असलेल्या ' सारथी ' संस्थेने ८५१ आणि ओबीसीसाठीच्या 'महाज्योती ' संस्थेने १२२६ संशोधकांनायांना सरसकट फेलोशिप दिली आहे. अडवणूक फक्त बार्टीने पात्र ठरवलेल्या ७६१ संशोधकांची सुरू आहे. अनुसूचित जातींच्या फक्त २०० संशोधकांनाच फेलोशिप देण्याची आडमुठी भूमिका सामाजिक न्याय खात्याने दुसऱ्यांदा घेतली आहे. याच भूमिकेतून २०२१ च्या संशोधकांनाही फेलोशीप नाकारल्याने त्याविरोधात लढावे लागले होते.

' क्रीमी लेअर ' चे बंधन घातले!

बार्टी, सारथी आणि महाज्योती यांच्या मार्फत फेलोशीप दिल्या जाणाऱ्या संशोधकांच्या संख्येत असमानता नको, इतकेच मुखमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षी सामाजिक न्याय खात्याच्या सचिवांना आमच्या शिष्टमंडळासमोर सांगितले होते. पण त्याचा गैरफायदा घेवून त्या सचिवांनी तीनही संस्थांच्या संशोधकांना ' क्रीमी लेअर ' चे बंधन लागू करून टाकले, अशी धक्कादायक माहिती प्रा एकनाथ जाधव यांनी आपल्या भाषणात दिली.

हडपसर रामटेकडी इंडस्ट्रीयल येथील पूना बायो कचरा प्रकल्पामध्ये साचले कच-याचे ढिग

हडपसर : हडपसर मधील रामटेकडी इंडस्ट्रीयल मध्ये असलेल्या पूना बायो एनर्जी कचरा प्रकल्पा बाहेर गेले तीनचार वर्षे झाले कच-याचे डोंगर साचलेले असून येथील प्रकल्पामधील साचून राहिलेल्या कच-याची मनपा विल्हेवाट लावत नसल्याने , कच-याचे मोठे डोंगर उभारल्याने कचरा प्रकल्पा आसपास राहाणा-या नागरीकांना हवा प्रदुषण तसेच दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.

रामटेकडी इंडस्ट्रीयल मध्ये पुणे महापालिकेचे या अगोदर तीन प्रकल्प होते , त्यातील रोकेम कचरा प्रकल्प हा गेले दोनतीन वर्ष झाले हा प्लांट बंद करण्यात आला असून रोकेम प्रकल्प सध्या बंद आहे. दुसरा दिशा कचरा प्रकल्प होता तोही सध्या बंद असून रोकेम व दिशा दोन्ही प्रकल्पात आता कचरा दिसत नाही ,दिशा प्रकल्पाचे शेड पाडून तिथे वेगळाच प्रकल्प करण्याचे काम चालू आहे.

रोकेम मधील मशीन जैसे थे आहेत.९ एकर मध्ये नवीन करण्यात आलेला पुना बायो एनर्जी सिस्टीम प्रा.लि.या कंपनीचा प्रकल्प सध्या चालू असून त्याची रोजची कचरा प्रक्रिया करण्याची क्षमता ३०० मेट्रिक टन आहे.परंतु प्रत्यक्षात तिथे तडून राहिलेला कचरा प्रक्रिया केली जात नाही,नवीन आलेल्या गाडीतील कचरा प्रक्रिया केली जाते जूना तीनचार वर्ष ढंपिंग करुन ठेवलेला केला जात नसल्याचे सांगितले जाते.

पुना बायो प्रकल्पास रोज कचरा कमी पडत

हडपसर रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील पुना बायो एनर्जी प्रकल्पा बाहेर मोठ्या प्रमाणावर साचलेला हजारो टन कच-याचा ढिग.

असल्याचे तेथील मॅनेजमेंट सांगत आहे.परंतु प्रकल्पा बाहेर मोठ्या प्रमाणावर कच-याचे साचलेल्या कच-याच्या ढिगारे याचे काय? महापालिकेकडून येथे कचरा साठविण्यात आला आहे, त्या कच-याची विल्हेवाट ना महापालिका करते ना पुना बायो प्लांट करते दोन्हीच्या मध्ये येथे कचरा साचून राहिलेला आहे. मनपा पुना बायो एनर्जी प्लांटला कचरा प्रक्रिया करण्यास ४१९ रु.पर मेट्रिक टन पैसे देते.मग येथे कच-याचे डोंगर उभारण्यात आलेले हटत का नाही , मनपा घनकचरा अधिकारी सांगतात की आम्ही पुना बायो एनर्जीस आतापर्यंत कचरा प्रक्रिया न केल्यामुळे १२ लाख ८१ रु दंड आकारला असल्याचे घनकचरा विभागाचे शेवते यांनी माहिती दिली.

रामटेकडी इंडस्ट्रीयल मध्ये मनपाने कोविड काळात जवळपास एक लाख चाळीस हजार मेट्रिक टन कचरा ढंपिंग करुन ठेवण्यात आलेला होता.आता सध्या पुना बायो प्रक्रल्पाबाहेर हजारो टन कचरा साचलेला आहे.साचलेल्या कच-याची मनपा विल्हेवाट लावते ना पुना बायो कचरा साचून राहिल्याने सध्या नागरीकांच्या आरोग्याचा , श्वनांचा प्रश्न निर्माण झालेला असून याला जबाबदार कोण असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

लाखो रुपयाचे बीले कचरा हस्तांतरण ढंपिंग करण्यात महापालिका घालविते , बीले ही मनपा कंपनींना अदा केलेली असेल.परंतु नागरीकांच्या आरोग्याकडे मनपा दुर्लक्ष करीत असल्याचे नागरिक सांगत आहेत. रामटेकडी इंडस्ट्रीयल येथील साचून राहिलेल्या कच-या विषयी घनकचरा आयुक्त संदीप कदम यांना माहिती विचारली असता ते माहिती घेऊन सांगतो असे उत्तर मिळाले.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा लक्षद्विपमध्ये उभारणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

मुंबई - जगभरातील अनेक देशात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत.आपल्या भारत देशात सर्व राज्यांत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत. लक्षद्विप या केंद्रशासीत प्रदेशात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अद्याप एक ही पुतळा उभारण्यात आला नाही.त्यामुळे लक्षद्विप मध्ये येत्या ऑक्टोबर पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला पुतळा उभारण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याची घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज येथे केली.

लक्षद्विपच्या मध्यवर्ती ठिकाणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात यावा अशी आपण मागणी केल्या नंतर लक्षद्विपचे प्रभारी प्रशासक प्रफुल्ल पटेल आणि जिल्हाधिकारी अर्जुन मोहन यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी प्रशासकिय मुख्यालय असणाऱ्या कवरती या मध्यवर्ती ठिकाणी जमीन देण्याचे मान्य केले.या ठिकाणि सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा मिळवून येत्या ऑक्टोबर पर्यंत लक्षद्विप मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी आपण पुढाकार घेण्यात असल्याचे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिले. कवरती हे गाव हे लक्षद्विपचे मुख्यालय आहे.येथे महात्मा गांधी यांचा पुतळा उभाण्यात आला आहे. लक्षद्विपला भेट दिल्यानंतर केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सर्व शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी लक्षद्विप मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्याची सुचना ना.रामदास आठवले यांनी केली.त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी जागा देण्याचे निश्चित करण्यात आले.